# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २४ मे २०१९

**विविध जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील**
**रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी २३ जूनला मतदान**

मुंबई, दि.२४ (रानिआ): रायगड, पुणे, अहमदनगर, हिंगोली, वर्धा, भंडारा व गोंदिया या सात जिल्हा परिषदांमधील नऊ रिक्तपदांच्या पोटनिवडणुकीसाठी आणि विविध १६ पंचायत समित्यांमधील १६ रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांकरिता २३ जून २०१९ मतदान; तर २४ जून २०१९ रोजी मतमोजणी होईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, या पोटनिवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रे ३ ते ८ जून २०१९ या कालावधीत स्वीकारली जातील. ५ जून २०१९ रोजी शासकीय सुट्टीमुळे नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. मतदान २३ जून २०१९ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल.

**पोटनिवडणूक होणाऱ्या जिल्हा परिषदनिहाय निवडणूक विभाग असे: रायगड-** कळंब (ता. कर्जत), **पुणे-** बावडा-लाखेवाडी (इंदापूर), **अहमदनगर-** बारागाव नांदूर (राहुरी), **हिंगोली-** येहळेगाव तु. (कळमनुरी), **वर्धा-** झडशी (सेलू) व मांडगाव (समुद्रपूर), **भंडारा-** ब्रम्ही (पवनी) व पालांदपूर (लाखनी) आणि **गोंदिया-** आसोली (गोंदिया).

**पोटनिवडणूक होणाऱ्या पंचायत समितीनिहाय निर्वाचक गण असे: पेण** (जि. रायगड)- वडखळ, **पालघर** (पालघर)- खैरापाडा, **हवेली** (पुणे)- वाडेबोल्लाई, **कागल** (कोल्हापूर)- माद्याळ, **देवळा** (नाशिक)- महालपाटणे, **चाळीसगाव** (जळगाव)- मेहुणबारे, **नेवासा** (अहमदनगर)- सोनई, **कर्जत** (अहमदनगर)- कोरेगाव, **केज** (बीड)- आडस, **बिलोली** (नांदेड)- अटकळी, **माहूर** (नांदेड)- वाई बा, **मुखेड** (नांदेड)- जांब बु., **औंढा ना.** (हिंगोली)- असोला तर्फे लाख, **गोरेगाव** (गोंदिया)- घोटी, **अर्जुनी मोरगाव** (गोंदिया)- माहुरकुडा आणि **हिंगणघाट** (वर्धा)- वडनेर.

**निवडणूक कार्यक्रमाचा तपशील**

- **नामनिर्देशनपत्रे सादर करणे-** ३ ते ८ जून २०१९
- **नामनिर्देशनपत्रांची छाननी-** १० जून २०१९
- **अपील नसल्यास उमेदवारी मागे घेणे-** १५ जून २०१९
- **अपील असल्यास उमेदवारी मागे घेणे-** १९ जून २०१९
- **मतदानाचा दिनांक-** २३ जून २०१९
- **मतमोजणीचा दिनांक-** २४ जून २०१९

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)